16



# मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ

गुरूवार दि. २४ फेब्रुवारी, १९९४ रोजी झालेल्या मंडळाच्या १६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

---

मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाची १६ वी बैठक गुरुवार दि. २४ फेब्रु. १९९४ रोजी सकाळी ११.०० वाजता प्राधिकरण सभागृह, ४था मजला, गृहनिर्माण भवन येथे संपन्न झाली. या बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १] | डॉ. शंकर वा मटकर ....... | सभापती |
| २] | श्री. हेमराज शहा ............ | उपसभापती |
| ३] | श्री. अशोक लाल ................ | मुख्य अधिकारी |
| ४] | श्री. पोतदार<br>प्रमुख अभियंता, मुंबई<br>महानगरपालिका यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ५] | श्री. व्ही. बी. वरसकर | सदस्य |
| ६] | श्री. कमलाकर शर्मा | -"- |
| ७] | श्री. शंकरराव पिर्टला | -"- |
| ८] | श्री. फारुख मन्सूरी | -"- |
| ९] | श्री. विवेक भर्तू | -"- |
| १०] | श्री. महमद आजम खान | -"- |
| ११] | श्री. श्रीकांत पाटील | -"- |
| १२] | श्री. चेतन शहा | -"- |
| १३] | श्री. गजेंद्र लष्करी | -"- |
| १४] | श्री. रॉकी फ्रास्टो | -"- |
| १५] | श्री. ना. कृ. नाईक,<br>उप करसंचालक व संकलक<br>मुंबई महानगरपालिका. | निमंत्रित |

श्री. यादवराव कांबळे, उपसचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग यांना मंत्रालयांत एका महत्वाच्या बैठकीस उपस्थित रहावे आवश्यक असल्यामुळे मंडळाच्या बैठकीस उपस्थित रहाणे शक्य नसल्याचे त्यांना अगावू कळविले आहे.

मा. सभापती डॉ. शंकर वा. मटकर यांचे अध्यक्षतेखाली सभेस प्रारंभ झाला. मा. सभापती, उपसभापती, सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करण्यांत आले.

- २ -

३

सभेचे नियमित काम सुरु होण्यापूर्वी सभापती डॉ. शंकर वा. मठकर यांनी उपमुख्य अभियंता [द] श्री. ज्ञानेश्वर हडदरे यांच्या मातोश्री. सौ. पार्वती रामराव हडदरे यांच्या दुःखद निधनाचे वृत्त सभागृहास दिले. दि. ६/२/९४ रोजी सांगली येथे त्यांचे हृदयविकाराच्या आजारामुळे आकस्मिक निधन झाले. सौ हडदरे यांच्या निधनाबद्दल सर्व उपस्थितांनी दुःख व्यक्त केले व पुढीलप्रमाणे ठराव एकमताने संमत केला.

ठराव क्र. १६/१२६

श्री. डी. आर. हडदरे, उपमुख्य अभियंता [दक्षिण] यांच्या मातोश्री सौ. पार्वती रामराव हडदरे यांच्या आकस्मिक निधनामुळे मंडळास तीव्र दुःख होत आहे. श्री. हडदरे व त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सभापती, उपसभापती, सदस्य व अधिकारी सहभागी आहेत. मृतात्म्यास चिरशांती लाभो ही प्रार्थना.

ठराव एकमताने संमत.

मा. सदस्य श्री. श्रीकांत पाटील यांनी प्रश्न विचारला की आजची बैठक प्राधिकरणाच्या सभागृहांत घेण्याचे कारण काय ? सचिव श्री. अतुल हुले यांनी खुलासा केला की सचिवालयीन शाखेत कोणीही कर्मचारी नसल्यामुळे तसेच काही महत्वाच्या न्यायालयीन प्रकरणी वैयक्तिक लक्ष घालावे लागल्यामुळे सभागृह आरक्षणाविषयीचे पत्र पाठविण्यास विलंब झाला व त्यादरम्यान गलिच्छ वस्ती सुधार मंडळाच्या बैठकीसाठी सभागृह आरक्षित झाल्यामुळे आजची बैठक प्राधिकरण सभागृहांत आयोजित करण्यांत आली आहे. मा. श्री. हेमराज शहा, उपसभापती यांनी बैठकीची विषयसूची उशीरा मिळत असल्याचे तक्रार करुन सचिवांच्या कार्यपध्दतीवर टिका केली. सविस्तर चर्चेअंती मुख्य अधिकारी यांनी सभागृहास सांगितले की सचिव पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री. हुले योग्य प्रकारे संभाळीत असून त्यांच्या कार्यपध्दतीत कोणताही दोष नाही. नियोजित वेळेमध्ये गृहनिर्माण भवनातील सभागृहांत मंडळाची बैठक आयोजित झालेली आहे. बैठकीची विषयसूची मा. सदस्यांना वेळेत मिळावी यादृष्टीने उपाययोजना करण्यांत येत आहे. यानंतर बैठकीच्या नियमित कामास सुरुवात झाली.

पुर्तता
सचिव

बाब क्र. १६/१

विषय:- दि. २० जानेवारी १९९४ रोजी झालेल्या मंडळाच्या १५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

........

मंडळाच्या १५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत पृष्ठ क्र. १ ते ३१ वर सादर केला आहे. ह्यावर सविस्तर चर्चा झाली. मा. श्री. श्रीकांत पाटील यांनी तक्रार केली की कार्यवृत्तांत सविस्तरपणे लिहिला जात नाही. यावर मुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की शासनाच्या तसेच प्राधिकरणाच्या कार्यवृत्तांत लिहिण्याच्या पध्दतीनुसार मंडळाचा कार्यवृत्तांत लिहिला जात आहे. कार्यवृत्तांतात चर्चेस आलेल्या सर्व मुद्यांचा परामर्श घेतलेला आहे. सविस्तर चर्चेअंती १५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

बाब क्र. १६/२

विषय:- दि. ३१/१/९४ रोजी झालेल्या १५ व्या जोड बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

........

दि. ३१/१/९४ रोजी झालेल्या १५ व्या जोडबैठकीचा कार्यवृत्तांत पृष्ठ क्र. ३३ ते ४९ वर सादर केलेला आहे. त्यावर सविस्तर चर्चा झाली. चर्चेनंतर १५ व्या जोडबैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

बाब क्र. १६/३

विषय:- अनुपालन अहवाल.

मा. सदस्य श्री. शंकरराव पिटला यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले की उपमुख्य अधिकारी [पु. गा.] यांचेकडून सदस्यांना एका पत्राद्वारे रिक्त गाळ्यांची माहिती प्राप्त झालेली आहे. सदर पत्रातील मजकूर वाचता येत नाही तसेच यापूर्वी आश्वासन मिळाल्याप्रमाणे पुनर्रचित इमारतीमधील रिक्त गाळ्यांचा अहवाल सदस्यांना प्राप्त झालेला नाही. सहमुख्य अधिकारी यांनी सदर यादी उपलब्ध करून देण्याचे मान्य केले. सादर केलेली यादी ही पुनर्विकासा द्वारे मंडळास उपलब्ध गाळ्यांची यादी असून तपासणी अंती ही यादी सदस्यांना पाठविल्याचे सांगितले.

पूर्तता : उपमुख्य अधिकारी [पु. गा.]

....४/-

७

बाब क्र. १६/४

विषय:- उपकरपात्र इमारतींना म्हाडा अधिनियम ८८[३] [अ] अन्वये द्यावयाचे प्रमाणपत्र.

.......

म्हाडा अधिनियम ८८[३] [अ] अन्वये इमारत प्रमाणित दुरूस्तीच्या खर्चा पलिकडील असे प्रमाणपत्र प्रदान करण्याचे प्रस्ताव पृष्ठ क्र. ५३ ते ७३ वर सादर करण्यांत आले आहेत. सविस्तर चर्चेअंती प्रस्तावित केलेल्या ३ इमारतींना म्हाडा अधिनियम ८८[३] [अ] अन्वये प्रमाणपत्र प्रदान करण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

ठराव क्र. १६/१२७

पुढीलप्रमाणे ३ इमारतींना म्हाडा अधिनियम कलम ८८[३] अ अन्वये प्रमाणित दुरूस्ती खर्चाच्या पलिकडील म्हणून घोषित करून प्रमाणपत्र प्रदान करण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

१] ४०६-४१२ पारशी वाडी, ना. म. जोशी मार्ग, ग/दक्षिण विभाग

२] २८९-२९३, शांती भुवन, साने गुरूजी मार्ग, मुंबई-११ ई विभाग

३] ३३, सी, धुरु खार वाडी, हातीसकर मार्ग ग/दक्षिण विभाग.

ठराव एकमताने मंजूर.

उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरूस्तीसाठी प्रस्ताव पृष्ठ क्र. ७५ ते ८३ वर सादर केले आहेत, सविस्तर चर्चेअंती सादर केलेल्या ४ इमारतींच्या संरचनात्मक दुरूस्तीच्या खर्चास प्रशासकिय मंजूरी देण्यांत आली.

ठराव क्र. १६/१२८

परिशिष्ठ "अ" मध्ये दर्शविलेल्या ४ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरूस्तीच्या खर्चास प्रशासकिय मंजुरी देण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

ठराव एकमताने मंजूर.

बाब क्र. १६/५

विषय:- कोहीनूर मिल चाळ क्र. ९, ज्योतिबा फुले मार्ग या इमारतीस लागलेल्या आगीत हानी पोहोचलेल्या भागाची दुरुस्ती करण्याविषयी.

........

उपमुख्य अभियंता [उत्तर] यांनी मा. अध्यक्षांच्या परवानगीने तांतडीची बाब म्हणून वरील प्रस्ताव मंडळास सादर केला. या संदर्भात त्यांनी माहिती दिली की नायगांव येथील कोहिनूर चाळ क्र. १ या उपकरपात्र इमारतीस रविवार दि. २०/२/९४ रोजी सकाळी १०.०० वाजता आग लागल्यामुळे या इमारतीच्या ५ खोल्यांचे मंगलोरी कौलांचे छप्पर भस्मसात झाले आहे. या इमारतीच्या हानी पोहोचलेल्या भागाच्या दुरुस्तीसाठी श्री. एच्. के. राठोड या वास्तुशास्त्रज्ञांची नियुक्ती झाली असून ढोबळ अंदाजपत्रकानुसार या दुरुस्तीसाठी सुमारे रु. ९०,०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे. दुरुस्तीचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यांत येत आहे. तांतडीची बाब म्हणून या दुरुस्ती खर्चास मंजुरी देण्याची त्यांनी विनंती केली. सविस्तर चर्चेअंती वरील इमारतीच्या तातडीच्या दुरुस्तीसाठी रु. ९०,०००/- एवढया अंदाजित खर्चास एकमताने मंजुरी देण्यात आली.

ठराव क्र. १६/१२९

कोहिनूर मिल चाळ. क्र. ९, ज्योतिबा फुले मार्ग, नायगांव फ/दक्षिण विभाग या इमारतीस आग लागून हानी पोहोचलेल्या भागाची तांतडीने दुरुस्ती करण्यासाठी विशेष बाब म्हणून रु. ९०,०००/- [रुपये नव्वद हजार फक्त] एवढया अपेक्षित खर्चास मंजुरी देण्यात आली.

ठराव एकमताने मंजूर.

आयत्या वेळेचे अन्य विषय:-

[१] मा. सदस्य श्री. शंकरराव पिटला यांनी निदर्शनास आणून दिले की तात्या घारपुरे पथ येथील इमारत क्र. ९८ व १०६ तसेच ६ अ ओवळवाडी या संयुक्त पुनर्बांधणी योजनेच्या प्रस्तावातील रहिवाश्यांच्या यादीमध्ये काही त्रुटी आहे. ६ अ ओवळवाडी ही इमारत पूर्वीच

....६/-

३ ३४२



कोसळली असून या इमारतीमधील काही रहिवाश्यांना "परिश्रम" या पुनर्रचित इमारतीत यापूर्वीच वितरण झालेले आहे. इमारत पूर्ण झाल्यानंतर वितरणाच्या वेळी गोंधळ होऊ नये या दृष्टीने या इमारतीमधील रहिवाश्यांची यादी पुन्हा तपासून त्याप्रमाणे सुधारीत यादी भूसंपादन प्रस्तावासोबत सादर करावी अशी सूचना श्री. पिटला यांनी केली. चर्चेअंती मा. सभापती, सहमुख्य अधिकारी, श्री. शंकरराव पिटला व संबंधित अधिका-यांची संयुक्त बैठक आयोजित करून रहिवा-श्यांच्या यादीत आवश्यक त्या सुधारणा करून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात आला.

पुर्तता: सहमुख्य अधिकारी

[२] मा. सदस्य श्री. चेतन शहा यांनी सूचना केली की ज्या उपकरपात्र इमारतीमधील रहिवाशी स्वखर्चाने पुन-र्बांधणी करण्यास तयार असतील, त्या इमारतीच्या रहिवाशी सहकारी संस्थेस इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीसाठी झालेला खर्च वजा करून दुरुस्ती खर्चाची उर्वरित रक्कम अदा करावी, व ही इमारत उपकरातून वगळण्यात यावी. अशा प्रकारे रहिवाश्यांना आर्थिक सहाय्य मिळाल्यास रहिवासी स्वत:च्या इमारतीचा पुनर्विकास करण्यास उद्युक्त होतील व त्याप्रमाणात इमारती दुरुस्त करण्याची मंडळाची जबाबदारी कमी होऊ शकेल.

या विषयासंबंधी कायद्याच्या तरतुदींचा सविस्तर अभ्यास करण्याची आवश्यकता आहे असे मत सभागृहाने व्यक्त केले. ... त ... ा.

[३] मा. सदस्य श्री. चेतन शहा यांनी सूचना केली की विकास नियंत्रण नियम कलम ३३[८] नुसार पुनर्बांधणी किंवा नागरी नुतनीकरण योजनेसाठी उपलब्ध असलेला अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक [३.१२] पुनर्विकास योजनेसाठीही उपलब्ध व्हावा, जेणेकरून १.१२ चटईक्षेत्र निर्देशांकाचे बांधकाम मंडळास संक्रमण शिबीरातील रहिवाश्यांना वितरीत करण्यासाठी

यासंदर्भात श्री. पोतदार, कार्यकारी अभियंता मुंबई महानगर- पालिका यांनी अशी माहिती दिली की मुंबई महानगर पालिकेच्या एका इमारतीच्या संदर्भात सदर प्रस्ताव शासनाच्या नगर विकास विभागास सादर केला होता, परंतु सदर प्रस्ताव शासनाने नामंजूर केलेला आहे. सविस्तर चर्चेअंती या प्रकरणी कायदेशीर बाजूंचा सविस्तर अभ्यास करूनच नियमित प्रस्ताव तयार करावा लागेल असे मत व्यक्त करण्यांत आले.

[४] मा. सदस्य श्री. श्रीकांत पाटील यांनी निदर्शनास आणून दिले की त्यांनी आमदार श्री. चंद्रकांत गोसालिया यांचे मालवणी संक्रमण शिबीरांतील अनधिकृत व्यक्तिंना काढण्या विषयीचे पत्र सुमारे १ महिन्यापूर्वी मा. सभापतींकडे सादर केले होते. मा. सभापतींनी संबंधित अधिका-यांना कार्यवाही करण्याच्या सूचना देऊनही कोणतीही कार्यवाही झालेली नाही. यासंदर्भात कार्यवाही करण्याचे सहमुख्य अधिकारी यांनी मान्य केले.

पुर्तता: उपमुख्य अधिकारी [सं. शि]

[५] मंडळाची १७ वी बैठक गुरुवार दि. २४ मार्च १९९४ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्याचे एकमताने ठरले.

पुर्तता: सचिव

मा. सभापती, उपसभापती, सदस्य, अधिकारी व निमंत्रित यांचे आभार मानल्यानंतर सभा समाप्त झाल्याचे जाहिर करण्यांत आले.

[ अतुल हुले ]
सचिव.

सही/-
मुख्य अधिकारी,
दु व पु. मंडळ, मुंबई.

सही/-
सभापती,
दु व पु. मंडळ, मुंबई.

परिशिष्ठ "अ"

दिनांक २४ फेब्रुवारी, १९९४ रोजी झालेल्या मंडळाच्या १६ व्या बैठकीत प्रशासकिय मंजुरी दिलेल्या अंदाजपत्रकांची यादी.

उत्तर परिमंडळ

| अ.क्र. | विभाग | कामाचे नांव | दुरुस्ती टप्पा / मंडळ/ नाह.प्र.प. | अंदाजपत्रकाची रक्कम / निव्वळ टप्प्याची रक्कम | दुरुस्ती दर प्रती चौ. मि. |
|---|---|---|---|---|---|
| [१] | [२] | [३] | [४] | [५] | [६] |
| १. | फ.ग. [द] | इ.क्र. ४३६-४४० लुईस मॅन्शन वीर सावरकर मार्ग | चौथा टप्पा / मंडळ | रु. १२,०८,८३३/- / रु. ५,३२,०३३/- | २१४०/- |
| २. | -"- | इ.क्र. ४४, महाजन वाडी, एलफिन्स्टन रोड | चौथा टप्पा / मंडळ | रु. ३,४४,७६४/- / रु. १,३२,१४६/- | ६८५=४१ |
| ३. | क.ग. [उ] | इ.क्र. ६४ लहर मुल्ला ट्रस्ट, गोखले रोड, दादर. | दुसरा टप्पा / मंडळ | रु. ५,१०,९०६/- / रु. ३,६२,८७३/- | ४१४=१५ |
| ४. | -"- | विजय नगर, डॉ. अेम. सी. जावळे मार्ग, दादर | पहिला टप्पा / मंडळ | रु. ११,५२,४५६/- / रु. ११,५२,४५६/- | १७७=५० |